९८५१०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९३९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

# रक्तिमा

कवि
कृष्ण मुकुंद उजळंबकर
एम. ए., एल् एल्. बी.,
एम. लिब्. एस्. सी.

REFBK-0009396
REFBK-0009396

कालिंदी प्रकाशन, मुंबई-१२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २२५५० वि. क १०५
क्रमांक १३८० नोंदणी ११/५/८०

# रक्तिमा

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८३५५

कवि

कृष्ण मुकुंद उजळंबकर

एम. ए., एल् एल्. बी.,
एम. लिब्. एस् सी.

REFBK-0009396
REFBK-0009396

कालिंदी प्रकाशन, मुंबई–१२

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति १९५७

प्रकाशिका :

सौ. कालिंदी उजळंबकर

कालिंदी प्रकाशन

३०३, मुंबई हाउसिंग बोर्ड, मुंबई १२.

मूल्य १॥ रु.

मुद्रक :

कमर्शियल प्रिंटिंग प्रेस

८३१, बेगमबाज़ार, हैदराबाद

# अनुक्रमणिका


१. रक्तिमा १
२. तुझ्यासाठीं भाऊराया २
३. दुडू दुडू बाळ धावें ५
४. येशिल दारीं कशी ? ७
५. जगीं माणुसकी कधीं यावयाची ? ९
६. अनुग्रह ११
७. ग्वाही ११
८. घुटमळतो कां दारीं पुजारी ? १२
९. समीप १५
१०. का म्हणशी सखया दिन ढळला १७
११. घट भरे शिगोशिग घे पिउनी १९
१२. या ग सयांनो या ग या २१
१३. छेड तुझें भावगीत २५
१४. मोत्यावाणीं फुलं कोण फुलवीं नभांत ? २७
१५. स्वामिनी तूं या जगाची २९
१६. वाहून माउली तूं ३०
१७. बरसे रिमझिम बरसात ३१
१८. पहाल माझ्याकडे ३२
१९. माझ्या घटांत अमृत भरलं ३३
२०. मी तृषार्त राहिलों ३४
२१. स्वप्न आज संपलें ३५
२२. तुम्ही याल घालीत लोटांगण ३६
२३. मी निर्माल्यहि गोड मानुनी ३७
२४. सांजवेळ झाली ४०
२५. मीच झेंडा रोविला ४१
२६. तुझ्या प्रेमाला जगीं तोड नाहीं ४२
२७. का अशा वृथा वल्गना ? ४४
२८. येऊं दे रे तुझ्यापाशीं ४६
२९. रे पुन्हां एकदां म्हणशिल ना ? ४८
३०. ये म्हणशिल तर ४९
३१. मी सासरीं निघालें ५०
३२. घेतें मी नांव नवं ५१
३३. म्हणा कुणी ग भोळी भाबडी ५२
३४. तुझ्यासाठीं ५३
३५. ही उभी एकली नदीतिरीं ५४
३६. डायरेक्शन ५६
३७. बघ नृपा महालीं घन कुजले ५८
३८. झालों मी राजा जर ? ५९
३९. लोकमान्यांच्या प्रती ६०

## हृद्‌गत

औरंगाबाद येथें भरणाऱ्या ३९ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलन प्रसंगीं 'रक्तिमा' हा ३९ कवितांचा संग्रह महाराष्ट्र रसिकांच्या सेवेंत प्रस्तुत करतांना दोलायमान होणाऱ्या मनास अत्यंत आनंद होत आहे. ३९वें महाराष्ट्र साहित्य संमेलन खऱ्या अर्थानें 'मराठी भाषिकांचें पहिलेंच संमेलन' आहे. निजामाच्या जुलुमी राजवटी खाली भरडला जाणारा 'मराठवाडा' आणि विदर्भ आपल्या मराठी मायभाषिकांच्या समवेत पहिल्यांदाच मानानें उभे आहेत. मराठी साहित्यास प्रतिष्ठा मिळवून दिली मराठवाड्यानेंच ! मराठीचें मोहरघर असणारा हा मराठवाडा राज्यकर्त्यांकडून केवळ उपेक्षिलाच गेला असें नाहीं तर मराठीच्या बंडखोर प्रवृत्तीस ठेचून काढण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत आले ! मराठी भाषिकांनीं माघार तर घेतली नाहींच उलट राजकीय दास्यांतून मुक्तता करविण्यात मराठी जनता अग्रेसर राहिली.

विचार, उच्चार आणि आचार स्वातंत्र्याच्या मुस्कटदाबींतूनहि मराठवाड्यांतील लेखकांनीं ही साहित्य परंपरा जागृत ठेवली आहे. 'नवोन्मेष' ही कादंबरी मी १९४६ मध्यें लिहून प्रकाशित केली. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं त्या कादंबरीस प्रस्तावना लिहून मराठवाड्यावरील आपलें प्रेम प्रकट केलें. ११ वर्षानंतर 'रक्तिमा' हा कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा योग येत आहे आणि तोहि साहित्यिकांचा मेळा एकत्र आला असतांना. हा खरोखरीच योगायोग आहे.

मुलगी माहेरी आली कीं सासरच्या सुखी संसाराच्या अनंत आठवणी ती बरोबर घेऊन येते ! माहेरच्या माणसांनीं आपलीं दुःखी कथा सांगून चार दिवसाच्या या अननुभूत आनंदांत मीठ कशाला कालवायचं ? पण हा विचारच कशाला ? या पुढं मराठी भाषिकांचीं सुखदुःखं एकत्र सोडविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

'रक्तिमा' या कवितासंग्रहासंबंधी बोलायचं तर 'भावनेच्या बळावर, माझ्या संसाराचे सार' असं एका कवितेंत मी म्हटलं आहे. मराठी भाषिकांनीं ही सेवा गोड करून घ्यावी.

५ मे ५७, मुंबई १२. कृ. मु. उजळंबकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 22440 दि: 9105
क्रमांक 9300 नों: दि: 30199
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8365

१. रक्तिमा

आकाशींच्या अंतराळीं वाहे झंझावात
पृथ्वीच्या या पायदळीं खेळे आनंदात ॥ध्रु०॥

रजनीनं रात्रभर केला जो गोंगाट
अजुनीहि दूर झाला नाहीं तो फुंकाट ॥१॥

उषादेवी पैंजणाचा वाजवी झंकार
रुणुं-झुणुं रुणुं-झुणु मंजू नादें आरंभी शृंगार ॥२॥

पश्चिमेच्या गालीं घाली लाली जे थैमान
हासुन हासुन लाजुन लाजुन झाली ती बेभान ॥३॥

येतां रवि स्वागतास झाली ती आतूर
कोकिळाही छेडताहे अंतरीचे सूर ॥४॥

मांगल्याची साक्ष देई घंटा मंदिरांत
स्नेहतेची पाजळली पुजाऱ्यानें वात ॥५॥

चंद्रिकेची कोर झाली लाजून गारेगार
प्रेमवेडी बालिका ही लपली मेघा पार ॥६॥

नील नभां झुलवील प्रीतीचा राया
कळ्या हांसू नाचतील प्रेमें डोलाया ॥७॥

सौगधानं प्रफुल्लित झाली ही अवनी
नैराश्येचे धुकें जाईल आतां विरघळुनी ॥८॥

## २. तुझ्यासाठीं भाऊराया

सात समिंदरा पार
गेला माझा भाऊराया
विसरला कसा मला
सादा कागूद धाडाया ।।ध्रु।।

किति विचारिलं त्यांनीं
आला सण दिवाळीचा
दादा सांग तुझ्याविना
कसा पार पडायाचा ।।१।।

फुलें, नळ, चंद्रज्योती
आणि फटाके वाजती
माझं घर खाई मला
भाऊ नसतां सांगाती ।।२।।

किती आणा भाका झाल्या
येईन मी दिवाळीला
वेळ टळूनहि गेली
सांग ओवाळूं कोणाला ? ।।३।।

किती सायासानं केलें
अनारसे तुझ्यासाठीं
खाऊं घालू सांग कुणा
भाऊ नाहीं माझ्यापाठीं ॥४॥

गाय हंबरते दारीं
पान्हा तिला आवरेना
दादा तुझ्याविना मला
घास ही रे घेववेना ॥५॥

बघ उचकी लागली
तूंच सय केलीस ना
सारीं कामं सोडूनिया
भेगी माझ्या घरीं ये ना ॥६॥

माझ्या भरलेल्या घरीं
नाहीं आलास तूं कधीं
तिथं करशील काय
दुरल्या रे देशामधीं ॥७॥

'दादा आला' 'दादा आला'
बोले राघू पिंजऱ्यांत
बघ नाचतो हा कसा
चर्र होई काळजांत ॥८॥

तुवा लाविलेली बाग
अश्रु ढाळी तुझ्याविना
येतां फुलतील कळ्या
दुःख त्यांना सहवेना ॥९॥

नाहीं आस रे पैक्याची
नको मला ओवाळणी
तुझ्यासाठीं भाऊराया
झालें रे मी दीनवाणी ॥१०॥

---

## ३. दुडूं दुडूं बाळ धावें

दुडू दुडू बाळ धावे दुडूदुडू बाळ
नका म्हणू बाई कोणी सोनुलं खट्याळ ।।ध्रु०।।

अंगणांत खेळताहे गोजिरं ग तान्हं
रुणू झुणू पैंजनाचा नाद ये कुठून ।।१।।

माझ्या सोनुल्याचे केस काळे कुळकुळीत
माझ्या लाडक्याचे गाल कसें गुबगुबीत ।।२।।

जाई जुई मोतियाचे असे शुभ्र दांत
मऊ मऊ गालिचाचे ओठ शोभतात ।।३।।

चिमुकल्या डोळ्यांतून शोधतो कुणाला ?
लागायाची दृष्ट बाई लावा तीट याला ।।४।।

राजा तुझ्या लग्नाचाहि बेत आम्ही केला
गोरी गोरी पिट्टराणी आणायाची याला ।।५।।

तिकडची आली स्वारी वाटतेच द्वारी
लबाडास चाहुलाची ओळख ही भारी ।।६।।

लपला हा दाराआड हांसतो गुलाम
गोड गोड पापा घेणं एवढंच काम ।७।।

बाळा तुझ्या एका शब्दीं स्वर्गीचें अमृत
जन्मो जन्मींची पुण्याई तुझ्या हांसण्यांत ॥८॥

तूंच एक ध्यानीं मनीं कांहीं ना सुचत
सासुबाई बोलतील कामं राहतात ॥९॥

## ४. येशिल दारीं कशी ?

येशिल दारीं कशी ?
सखे तूं येशिल दारी कशी ? ॥ध्रु०॥

मादकता मदनाची नयनीं
उन्मादाची मत्त वारुणी
भिनली का तव नसानसांतुनी
अननुभूत उर्वशी ॥१॥

सृष्टि सतीच्या आवरणांतून
दवबिन्दुचे मौक्तिक वेंचून
लताफुलांच्या उद्यानांतून
वनमाला ये जशी ॥२॥

सौंदर्याचे ललित रजःकण
सुवर्णपात्रीं घोटून उजळुन
उधळित येशिल संध्या होऊन
कुरवाळाया कुशी ॥३॥

हास्य-चंद्रिका अनंत फुलवून
हृदयज्योत त्या मधि पाजळून
मांगल्याच्या झंकारांतून
तमिस्रेस उजळिशी ॥४॥

रणचंडीच्या यज्ञकुंडितून
कंटकमय किल्मीष धरेंतून
पवित्र तेजें अवनी दिपवून
सीता सति ये जशी ॥५॥

---

## ५. जगीं माणुसकी कधीं यावयाची ?

भव्य प्रासादीं रीव ब्राह्मणांची
बघुनि थांबे ती तिथें एकदाची
आंतुनिया ये मधुर घमघमाट
पडे दृष्टीला राजशाही थाट ॥१॥

भुकें व्याकुळ हो गरिब भिकारीण
आणि बोले ती हृदय पिळवटून
'कुणी वाढा हो भीक मला माई
लई दिवसांनीं पोटिं अन्न नाहीं ॥२॥

बाळ माझा घरिं फार अजारी हो
शिळें, पाकें तरि अन्न द्या मला हो
दया दीनांची येऊं द्या तुम्हाला
तुम्ही कैवारी नाथ अनाथाला' ॥३॥

क्षणीं चाहुलही तिथें ऐकूं येई
तिला वाटे कीं आस पूर्ण होई
तोंच कानीं तिज शब्द ऐकूं आले
परी आशेनें जागची न हाले ॥४॥

'ऊत आला या गावि भिकाऱ्यांचा
घरीं दारीं ये पूर गरीबांचा
धर्मशाळा ना, चाल तूं इथोनी
येशि दारीं तूं का बरे चढोनी ? ॥५॥

होत असतांना पंक्ति ब्राह्मणांच्या
नको हाका त्या येथ भिकाऱ्यांच्या'
बंद झालें तें दार आंतुनिया
निघे तिथुनि ती मार्ग आक्रमाया ॥६॥

कांहीं न कळे ती पुन्हां परत आली
म्हणत 'गरिबांचा नाहि कोणी वाली'
होई कासाविस फार ती भुकेनें
मिळो उष्टें तरि एवढ्या मिषानें ॥७॥

आणि बाळाला घास द्यावयाला
जीव बाईचा कष्टला भुकेला
तोंच बसली ती घेरि येऊनिया
ढेकरांचा ये ध्वनी आंतुनिया ॥८॥

पाहि आशेनें वाट, तोहि आला
'देवबाप्पा, लइ औक्ष दे तुम्हाला'
'थांब जायाची नाहीं तूं अशानें
दगड उचलोनि मारिला तयानें' ॥९॥

'हाय बाळा रे भेट दैवि नाहीं
बरे येतें मी रहा सुखी राही'
म्हणत तेथें ती झोपली सदाची
जगीं माणुसकी कधीं यावयाची? ॥१०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 22440 दि: 3/04
क्रमांक 9320 नों दि: 3-01991

## ६. अनुग्रह

विशाल नेत्रीं जिवाजिवाच्या
मधुर भावना तरंगतांना
नको म्हणावें कुणी कुणाला
कळोनिया हें परस्परांना

## ७. ग्वाही

जरी न संभाषणीं कधीं ही
सुयोग आला जुळून कांहीं
मदीय मूर्ती तुझ्या मानसीं
मला तूं नि मी तुलाच ग्वाही

## ८. घुटमळतो का दारिं पुजारी

घुटमळतो का दारिं पुजारी
करावया मंदीर खुलें ?
नयनींचे सद्‌भाव माझिया
कठोर हृदया कुठुनि कळे ।।१।।

घन तिमिरांचें पटल हो दुरी
भासे न्हाउनि आली रजनी
हत्कुसुमांची ओंजळ राया
तुझ्याच वाहीन मी चरणीं ।।२।।

अजुनि पाजळे ज्योत कालची
इथें आज तर राज्य करी
भाव मनींचे एकवटोनी
फुलवाती मी धरिलि करीं ।।३।।

निर्माल्याचें राज्य संपलें
सुगंध उपवनिं दरवळला
माझें पहिलें फूल वाहण्या
कण-न-कण हृदि प्रफुल्लला ।।४।।

गेली सारी रात कशी तरी
नयनिं आंसवें थबथबलीं

अश्रु बिन्दुचे ओघळ राया
कितीक गालीं विरघळलीं ॥५॥

भरली मूर्ति नयनीं राजसा
नीज कुठोनि मग यायाची
विश्व झोंपतां स्वप्नींहिं तूं
अवचित येशी मम दाराशीं ॥६॥

हृदयीचें तूं दार उघडलें
सुकुमार मूर्ति मम दिसें मला
माझेंपण मी विसरून गेलें
मिठी मारली तुझ्या गळां ॥७॥

गत स्मृती ती मनिं बांधुनी
आलें भर भर चढण चढोनी
जन लज्जेची खंत ना मला
मी प्रीतीची सुवासिनी ॥८॥

उघड पुजाऱ्या दार सख्याचे
हयगय रे का प्रीति घरीं
हंसली मूर्ति बघशी काय तूं
माझ्या मनिंच्या या कासारीं ॥९॥

सुमन भक्तिचें तिथें उमललें
प्रतीक माझ्या तें जीवाचें

बद्ध शृंखला खुल्या करोनी
मीलन कधि रे मग व्हायाचें ? ।१०॥

घुटमळतो का दारिं पुजारी
करावया मंदीर खुलें
नयनींचे सद्भाव माझिया
कठोर हृदया कुठुनि कळें ॥११॥

९. समीप

किर्रर् झाडीं सभोवतीं
हासे उपाहासें काळ
करी तुझ्याविण कोण ?
पतितांचा प्रतिपाळ ॥ध्रु०॥

उन्मादाच्या स्वैरभ्रांतीं
तुला बोललों टाकून
आतां क्षमेची याचना
करी प्रकाशें पावन ॥१॥

आकांक्षाचे महादुर्ग
उल्लंघाया यत्न केले
केले रान जीवाचें या
परि यश नाहीं आले ॥२॥

मृगजळ समजोनी
तरी केली आटापीट
साहसाच्या लाटावरी
वल्हविली मीहि बोट ॥३॥

फेंसाळत्या पाण्यावर
पवनानं साथ केली

तारकांनीं दृष्टी देतां
तुझी ज्योत मालवली ॥४॥

आला वारा सोसाट्याचा
सागरहि क्षुब्ध झाला
खवळलें माझें मन
जिंकण्याचा पण केला ॥५॥

भावनेच्या बळावर
माझ्या संसाराचें सार
तेंच उलटलें आतां
दोष देतों दैवावर ॥६॥

कोठें तरी दूर दूर
तुझा मिणमिणे दीप
एक आस अंतरीची
घ्यावें चरणां समीप ॥७॥

---

## १०. का म्हणशी सखया दिन ढळला ?

का म्हणशी सखया दिन ढळला ?
घट तुझा अमृतें खळखळला ॥ध्रु॥

अनंत फुलतीं फुलें उपवनीं
गणना केली त्यांची कोणी
परी तुझ्या रे भाव फुलांनीं
अमर वास वनिं दरवळला ॥१॥

मञ्जू नादें कुणीं मोहिलें
नितांत संगित कुणी छेडिलें
संमेलन परि तुवांच केलें
ही अतुल प्रभावी तुझी कला ॥२॥

तारुण्याचीं प्रणयी गीतें
वात्सल्याचे भाव जयातें
स्नेहलतेनें अधिकच खुलते
ही काव्य संपदा मिळे तुला ॥३॥

तोषवावया क्षुधा जिवाची
दुरी सारण्या व्यथा मनींची
पुरे तुझी ती वाटि दुधाची
तू निर्जन वनि फुलविला मळा ॥४॥

दृष्टि तुझी जरि पैलतिरावरी
वृत्ति तुझी का होई बावरी
जा ! देवांच्या अजिंक्य नगरी
तूं मंत्र मरणिं अमरता दिला ॥५॥

---

## १२. घट भरे शिगोशिग घे पिउनी

घट भरे शिगोशिग घे पिऊनी
नव वसंत फुलुं दे तुझ्या मनीं ॥ध्रु०॥

मंद सुगंधित वाहे वारा
नभीं हासल्या अनंत तारा
ये बाहेरी सोडुनी घरा
मधुचंद्र भूषवी बघ अवनी ॥१॥

विसरुनि जाऊं भेसुर जीवन
बंध मानवी दे झिडकारून
दो हृदयांतिल अंतर विसरुन
ये छेडूं प्रीति नसनसांतुनी ॥२॥

तुझ्या कराचा स्पर्श हो जई
श्रम मी माझें विसरुनि जाईं
धुंद दशदिशा देती ग्वाही
बघ प्रणयिं रंगली ही रजनी ॥३॥

भाव हृदींचें छेडुनि सुस्वर
रुणु झुणू दे तव दारीं नुपुर
होई वेडा जीवहि आतुर
पळ युगसम भासे क्षणोक्षणीं ॥४॥

कलषांतुनि मधु ये ओसंडुनी
तृषार्त जीवा हीच पर्वणी
प्रेममयी तूं तूंच स्वामिनी
ये उधळित आशा ये रमणी ॥५॥

## १२. या ग सयांनो या ग या

ग्रंथालय
दा. क्र. ८३८५...
संग्रह शाखा

या ग सयांनो या ग या
हासूं नाचूं खेळूं या
झिम बाइ झिम् झिम्मा झिम ॥ध्रु०॥

रवि प्रकाशुनि जगताला
गेला आपुल्या गांवाला
हांस हासला
हांसुनि दमला
आला आतां शशिराया ॥१॥

प्रीत पाखडी नभीं शशी
खेळ खेळतो रजनीशीं
क्षणीं दिसतसें
क्षणीं लपतसें
प्रणयीं आपण पोहूं या ॥२॥

मुरडुन पाहे शेवंती
मोद जाहला तिला अति
उन्मादाची
प्रीति रसाची
लकेर आली कोठुनिया ? ॥३॥

हुर हुरते बघ ही जाई
व्याकुळ विरहानें होई
व्यथा मनींची
सलज्जतेची
उत्सुक झाली सांगाया ॥४॥

ये ग चिउताई बाहेरी
प्रणयाच्या या मंदिरीं
घरटया मधुनी
मुक्त होउनी
ये स्वच्छन्दें विहराया ॥५॥

काऊ दादा तूं ही ये
अभिलाषांना सोडुनि ये
पाप कल्पना
विसरुनि जा ना
विकास आपुला करूनिया ॥६॥

मैना, कोकिळ एकरवें
इथें छेडिती गीत नवें
नव्या रसाचे
नव तेजाचे
भेद मानवी जात लया ॥७॥

तुषार उडवी प्रीतीचे
थय् थय् सागर हा नाचे

बघ खळखळला
धुंद जाहला
प्रणयोन्मादें रिझवाया ॥८॥

रात्रीची ही सुवासिनी
रात राणी नच ये दिसुनि
थबकत येइल
लाजत जाइल
प्राण सख्याला भेटाया ॥९॥

नाजुक हा जरि निशि गंध
प्रणयोन्मादें हो धुंद
स्वतःस भुलला
भान हरपला
आपण त्याला रिझवू या ॥१०॥

बकूळ जाई लुकलुकती
खुलेल यांची ग कान्ती
भर भर या
उधळत या
प्रीति गोफ ग गुंफाया ॥११॥

वनराईतिल निशाचर
जरि असती तें मनि चतुर

हिंसकतेला
कठोरतेला
विसरुनि येतिल उपवनिं या ॥१२॥

मानव आतां पहूडला
झोपेमधिं रंगुनि गेला
विसरा त्याला
क्षुद्र बुद्धिला
आकांक्षांना लंघुनिया ॥१३॥

या तारांनों, लता फुलांनो
मानवतेच्या सहकाऱ्यांनो
अमृत घटिंचे
माधुर्याचे
घोट घ्यावया चटकन या ॥१४॥
या ग सयांनो, या ग या

---

## १३. छेड तुझें भावगीत

तुझ्या नयनांत खेळे
तारकांची पवित्रता
क्षणोक्षणीं नवीनता ।।ध्रु०।।

दरवळे तुझ्या नेत्रीं
रातराणीचा सुगंध
झाल्या दशदिशा धुंद ।।१।।

काळ्या कभिन्नशा रात्रीं
दीप मिणमिणे जसा
मला तुझा कवडसा ।।२।।

माझ्या मनोमय आशा
तुझ्या छायेमधि येतां
होई तयांची सांगता ।।३।।

बघ कसे लकाकती
टपोरे हे तुझे डोळे
किती करतील चाळे ।।४।।

लता प्रणयीं नाचती
डोलताती अंगणांत
तुझ्या जादू ही करांत ।।५।।

जरी तुझें गोड नांव
जपतों मी रात्रंदीन
तरी बुझेना तहान ॥६॥

किती वाट पाहूं तुझी
प्रतीक्षा ना आतां पुरे
जीव तुझ्यासाठीं झुरे ॥७॥

सृष्टी झाली प्रमुदित
बहरली चांद रात
छेड तुझें भावगीत ॥८॥

---

## १४. मोत्यावाणी फुलं कोण फुलवीं नभांत

मोत्यावाणीं फुलं कोण फुलवीं नभांत ?
कुणी पाजळले बाई दीप आकाशांत ? ॥ध्रु०॥

आजीबाई करी काय गजरा कुणा ?
वेड फार फुलांचं का लेकी सुनांना ? ॥१॥

---

नीशाताई हांसली का प्रेमें आनंदून ?
प्रीतीचें हे तुषार का येती मुखांतून ? ॥२॥

काळी चंद्रकळा कां ही ल्याली बरे आज ?
शुभ्रांकित मोत्यांचा कां चढविला साज ? ॥३॥

ज्योत्स्नाबाई लपंडाव खेळशीं का तूं ?
घुंगुरवाळ्याचे हे का ग पडलें बिंदू ? ॥४॥

प्रेमाचा का नजराणा धाडियेला सांग ?
त्रीभुवनीं राज्य तुझें पसरे अथांग ? ॥५॥

घुसळून घुसळून काढिशी लोणी ?
मैत्रिणींना मुक्त हस्तें देशी वाटोनी ? ॥६॥

खाली दरवळे रानिं फुलांचा सुवास
धुपारती लाविल्या का तूं ग मंदिरांत ? ॥७॥

शशीनें का दिले तुला चेंडू खेळाया ?
टुणूंटुणूं लुटूंलुटूं लागे धावाया ? ॥८॥

सागरहि स्थिर झाला तुझ्या दर्शनास
चंद्रिकेच्या पायीं ओती चांदिची का रास ? ॥९॥

चांदण्यांत खेळ खेळूं वारा वाहे मन्द
गाणें गाऊं हासूं खेळूं आनंदी आनंद ॥१०॥

---

## १५. स्वामिनी तू या जगाची

स्वामिनी तूं या जगाची विश्व जननी तूं खरी
सात जन्मींचें मिळूं दे भाग्य तव स्नेहोदरीं ॥ध्रु०॥

शिंपिलें प्रेमामृताचें कुंभ तूं अवनी वरी
बिंदु बिंदूतून सिंधू वाहती पृथ्वी वरी ॥१॥

प्रीतीचे, शालीनतेचे लावूनिया तूं मळे
वृक्ष ते फोंफावले श्रांत पांथा माधुरी ॥२॥

सांठवोनी ठेविलेला घास ओंठीचा मुखीं
तो भराया सोनुल्यांना तळमळे तूं अंतरी ॥३॥

मार्ग कांटेरी जरी ही घाव टाकीचें शिरीं
अश्रु नयनिं ना ढळे दृष्टि तव बाळावरी ॥४॥

सारखे दुःखांत सौख्यें ठेवुनी ओठीं हंसू
गूढ तूझे ना कळे मोहिनी सर्वांवरी ॥५॥

अंतरीची एक आशा मृत्युची नाहीं क्षिती
येऊं द्या निद्रा सुखाची आईच्या अंकावरीं ॥६॥

---

## १६. वाहून माउली तूं

वाहून माउली तूं नऊ मास भार पोटीं
आठी न ये कपाळीं ना शब्द येई ओठीं ॥ध्रु०॥

कामांत ही तुझी गे बाळावरीच दृष्टि
खाऊस हट्ट घेतां सांगून गोड गोष्टी ॥१॥

दारिद्र्य झांकलेस झांकुनिया मुठीला
ओठी हंसू परन्तू ज्वालाग्नि पेटलेला ॥२॥

तुझवीण कोण आई घालील गोड घास ?
कुरवाळुनी कुशींत आधार या पिलास ॥३॥

स्वार्थांध या जगांत माया मुळीं न कांहीं
तुजवीण कोण आई गोंजारणार नाहीं ॥४॥

स्पर्शें सुवर्ण होई जादू तुझ्या करांत
हालाहला पिऊनी जगिं एक तूं समर्थ ॥५॥

प्रेमामृतें तुझ्या गे मिटतील द्वेष भाव
तुझिया कृपा प्रसादे माणूस होई देव ॥६॥

---

## १७. बरसे रिमझिम बरसात

बरसे रिमझिम बरसात मोत्यीं टिपतीं दारांत
सप्सप् धप्धप् गर्जंत रिम्झिम् झिम्मा खेळत ।।ध्रु.।।

आल्या दुधाच्या या धारा
वेंचा टिपून घ्या गारा
पटकन टाका ग तोंडांत ।।१।।

धरणी खुदकन हांसली
शेतं न्हावून निघालीं
फुललीं, नाचलीं डौलांत ।।२।।

जमीन पिकवूं तसूं तसूं
गाळून घाम तिला आणूं हसूं
कष्टाची भाकरी दौलत ।।३।।

अवंदा पिकेल शेतांत
होईल धान्याची खैरात
चाले शेतकरी तोऱ्यांत ।।४।।

## १८. पहाल माझ्याकडे

पहाल माझ्याकडे, असे हो कुठवर सांगा गडे ।।ध्रु.।।

नयनिं कुणाच्या जादू भरली ?
गालीं कुणाच्या लाली खुलली ?
गोड गुलाबी कळी उमलली
खळी कपोली पडे ।।१।।

हृदयीं माझ्या वेली फुलली
मुदें बहरली, सुखें विहरली
राया तुजवर दृष्टि खिळली
लता तरूविण अडे ।।२।।

तुझी नि माझी अनुपम जोडी
संसाराची अथांग होडी
वल्हवीन मी तूं नावाडी
जाऊं किनाऱ्याकडे ।।३।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत.
अनुक्रम 22440 दि: 91104
क्रमांक 9320 नों: दि: 30/11/80.

## १९. माझ्या घटांत अमृत भरलं

माझ्या घटांत अमृत भरलं
राया, अंगणीं चांदणं फुललं ॥ध्रु०॥

जाई जुईनं शिंपुनी सडा
रातराणीनं भरला घडा
मदनानं उचलिला विडा
पाना पानांत वारं सळसळलं ॥१॥

आली नेसून शालू रजनी
तिच्या जिवाचा जिवलग कोणी
गाई प्रीतीची नव नव गाणीं
माणिक मोत्यानं नभ मोहरलं ॥२॥

लाजवन्ती ग चंदाराणी
चमेलीची ग गुंफुन वेणी
आली नटून थटून ग सजणी
शुभमंगल रानोरानीं घुमलं ॥३॥

## २०. मी तृषार्त राहिलों

विश्व सर्व पाहिलें भोग सर्व भोगलें
संथली हि पाऊलें मी तृषार्त राहिलों ॥ध्रु०॥

ऊंच ऊंच या नभां घालण्यास गवसणी
हिंडहिंड हिंडलों मी तृषार्त राहिलों ॥१॥

चंद्रिकासवें कधीं खेळण्या नभांगणीं
धावलों नि श्रांतलों मी तृषार्त राहिलों ॥२॥

कुंभ प्रीतीचें जगीं जागजागी मांडिलें
तें रिते हि जाहलें मी तृषार्त राहिलों ॥३॥

भव्य भालीं रजनिच्या भानू लाविती टिळा
आटोपलाहि सोहळा मी तृषार्त राहिलों ॥४॥

मधु घटांतुनी तुझ्या एक घोट त्यांतला
काय तोहि आटला मी तृषार्त राहिलों ॥५॥

## २१. स्वप्न आज संपलें

स्वप्न आज संपलें रम्य जीवनांतलें ।।ध्रु०।।

गोडवा न या पुढें न पाहणें कुणाकडे
बोलणीं पदोपदीं भव्य चित्र भंगलें ।।१।।

भावतार छेडुनी पूजिलें तुला मनीं
व्यर्थ आज जाहलें काव्य मन्मनांतलें ।।२।।

ये वसंत वा शरद् न हासणार या कळ्या
वाहणें तुझ्या पदींच भाग्य तें न लाभलें ।।३।।

मूर्ती राजसा तुझी रोमरोमीं बिंबली
भस्म आज जाहलें स्तंभ मंदिरांतलें ।।४।।

जें कधीं न कल्पिलें चिंतिलें न पाहिलें
काळ गर्जतो कराळ नादतात पाऊलें ।।५।।

## २२. तुम्ही याल घालीत लोटांगण

नसे संपदा शक्ति सामर्थ्य अंगीं, तरी चाललों मात्र ध्येयाकडे
उन्हाच्या झळाळया न छाया कुठेंही, जरी भाजती पाय मार्गी खडे
कसा जीव व्याकूळ होऊनि जाई, हृदीं वेदना होती ठेचाळतां
कुणा दुःख सांगूं किती कष्ट साहूं, जरी शीण ये आयु ही कंठितां

कुठें मंदिरीं नृत्य-संगीत चालें, महालीं कुण्या 'श्री' असे रंगली
अनीतीहि नीती ठरे ज्या ठिकाणीं, कलेला तिथें श्रेष्ठता लाभली
नसे मान्यता एथ विद्वज्जनाला, वशीला मिळावा तया कोठुनी
जुळावी कशी हांजी हांजी तयांना, हंसावें वरी अन् कढावें मनीं

व्यथा अंतरीच्या कुणा दाखवूं या, इथें आपुलें आढळे ना कुणी ?
नसे अश्रू गाळावया स्थान एथें, अपेक्षा करावी कुणापासुनी ?
करी कोणी निंदा, टवाळीहि कोणी, कुणी हांसती दावुनि वांकडे
कुठें लोपली न्यायदेवी दयाळा ? पळालीहि ती स्वर्ग लोकांकडे

छळा रे खलांनों ! नको छत्र छाया, दयेची न आशा तुम्हांपासुन
यशोमार्ग उल्लंघुनि जाऊं जेव्हां, तुम्ही याल घालीत लोटांगण

## २३. मी निर्माल्यहि गोड मानुनी

स्वैरपणें संचार कराया
मार्ग खुला रे तुझा तुला
जातांना परि ठेवा मनिंचा
नकोस विसरूं तूं नेण्याला ॥ध्रु०॥

वाहत होतें विशुद्ध वारें
सरिता आळवि जणुं अंगाई
मुसमुसणाऱ्या तारुण्याची
मिरवित होती ती ग्वाही ॥१॥

झेंपावत तूं येशि कुठुनि तरी
दृष्टि तुझ्यावर स्थिरावली
पटली ओळख दो जीवांना
जल लहरीनीं साथ दिली ॥२॥

प्रवाहास तूं कंपित करितां
सळसळ माझ्या उठे उरीं
वृत्ति तुझी झुंजार पाहुनी
काळहि फिरला कीं माघारी ॥३॥

नव्हतें माझ्या जवळीं द्याया
हवें तुला जें गीत नवें
प्रेमहि नव्हतें मम सांगाती
एक कराया दोन दुवे ॥४॥

पाहुनि माझी दृष्टि बावरी
हासलास तूं का उपहासे
रागामध्यें अनुरागाचे
तुझ्या मनीं का काव्य वसे ? ॥५॥

तुज जवळीं तें होते म्हणुनी
विसरूनि गेलों परस्परा
भिन्नत्वाची दिव्य प्रतीति
सारुनि आल्यें तुझ्या घरां ॥६॥

कलकलाट करूनी काकांनीं
अशुभ नेमकें वर्तविलें
अमंगलीं तूं मांगल्याचे
निखाऱ्यांत फुलविलें मळे ॥७॥

जीवित नौकेचा नावाडी
काहूर तूंते काय करी
तुफान दर्या खवळत असतां
घेतलेस तूं मला उरीं ॥८॥

कानीं येऊनि कुजबुजलाशीं
हृद्‌गत अपुल्या मनांतलें
कुहूकुहूचा सादहि आला
प्रणयोन्मादें भुरळ पडे ॥९॥

आली भरती खवळे सागर
कलंडली मग आपुली नांव
वल्हविशी तूं जरि अजुनी ही
नको पुसूं रे मम गांव ॥१०॥

विस्कटलेल्या दग्ध पाकळ्या
चुरगाळूं तूं नको परी
मी निर्माल्यहि गोड मानुनी
आस मनीची पूर्ण करी ॥११॥

---

## २४. सांजवेळ झाली

सांजवेळ झाली बाई सांजवेळ झाली
कशी अजुनि सोनुलीला, नीज नाहीं आली ।।ध्रु०।।

दिनमणी कलंडला पलाडल्या टेकडींत
झोंपण्यास आतुरला आईच्या कुशींत ।।१।।

गाय हंबरते दारीं बघुनि पाडसास
चिऊ काऊ मित्र तूझे परतले घरास ।।२।।

परतल्या मैना राघू घरटचांत विसाव्यास
कुरकुरे पाळण्याची दोर झोंपण्यास ।।३।।

आला बघ बागुलबुवा पुरे तुझा हुडपणा
धीट किती मुलुखाची हंसे माझी मैना ।।४।।

हिंदळशी कोठवरी दृष्ट तरि काढा बाई
लागला कीं डोळा आतां नका करूं घाई ।।५।।

## २८. मीच झेंडा रोविला

रोविला मी, रोविला मी मीच झेंडा रोविला
द्या सुळी, फांसावरी हि मीच झेंडा रोविला ॥धृ०॥

मत्त साम्राज्यावरी ज्या सूर्यही ना मावळे
अंजनीच्या या सुतानें आज त्याला ग्रासिलें ॥१॥

भारताच्या बांधवानों गोजिरीं माझीं मुलें
पोरकी होणार आतां रम्य उद्यानीं फुलें ॥२॥
थोरला माझा कलीजा कोवळा सुकुमार चिलया
चाललों सोडून बाळा दाखवा तुम्हींच माया ॥३॥
जाहलें नाहीं अजुनि सोनुलीला वर्ष एक
हट्टी नाहीं पोर माझी ती आतां तुमचीच लेक ॥४॥
पूजिलें काढून कुंकू तीच माझी ही सती
पूज्य त्या नीरांजनाची ज्योत ठेवा जागती ॥५॥
पूस अश्रु लोचनीचें चाललों सोडून आई
लाडका हा बाळ तूझा तो उद्यां दिसणार नाहीं ॥६॥
मर्त्य या देहांत माझ्या एक आशा अंतरीं
फडकवा झेंडा तिरंगी माझिया अस्थिवरी ॥७॥

---

## २६. तुझ्या प्रेमाला जगीं तोड नाहीं

वाहिलाशीं नऊ मास भार पोटीं
तुझी होती मज एक कृपा दृष्टी
कधीं प्रेमानें तुवां थोपटीलें
म्हणुनि अंगाई मला झोंपवीलें ॥ध्रु०॥

तुझ्या छायेमधीं वाढलों सुखानें
दुग्ध प्रेमाचे पिउनि आनंदानें
हट्ट घेतां मी चेंडू खाऊ साठीं
कोण गोंजारी सांगी गोड गोष्टी ॥१॥

मला नव्हती जाणीव म्हणुनी आई
तुला छळिलें मी वदे टाकुनी ही
कधीं खेळाया होई रात्र जेव्हां
काम सोडोनी येई कोण तेव्हां ? ॥२॥

मारी दादा मज पाहवे न तुजला
मधें पडुनी तूं येशी सोडण्याला
"नका मारूं हो, बाळ गुणी माझा
मला मारा परि नका छळूं राजा" ॥३॥

शब्द येति न ते आजला कुठोनी
फोल आशाहि ना मिळे झुरोनी
म्हणो स्वार्थी कुणि प्रेम तुझें आई
तुझ्या प्रेमाला जगीं तोड नाहीं ॥४॥

---

## २७. का अशा वृथा वल्गना ?

जर स्वतंत्रतेची तुला न ये कल्पना
या करिशि लोकशाहीच्या का अशा वृथा वल्गना ? ॥धृ०॥

घनघोर संगरा प्रवृत्त करिशी जना
रुधिराश्रित धरणी खड्ग करिती खणखणा
किति अर्भक अबला सोडिलेस तूं कुणा
होणार भस्म का मानवतेच्या काव्य मधुर प्रेरणा ? ॥१॥

मिळवुनी धुळीला गरिबांचीं तूं घरें
हा स्वार्थ लपविण्या उभविलीस मंदिरें
समतेची पूजा करिशी तूं का बरें ?
का सोंगावरती पांघरूण हें तुझें असे सांग ना ? ॥२॥

तूं स्वयें स्वतःला कला भक्त म्हणविशी
प्रांगणीं प्रीतिच्या प्रेम काव्य फुलविशी
पाहुनी जयाला आम्ही पडतो फशी
अन् ओकित जाशी जहर विषारी नष्ट करुनि भावना ॥३॥

पडसाद पडू दे निस्पृहतेचे तरी
का सम्राज्याची आस धरूनी अंतरीं ?

तूं प्ररित होशी स्वार्थाच्या संगरीं
हा भस्मासुर रे पेटविशी का हीच धरूनि कामना ? ॥४॥

का नव्या जगाची निर्मिति हो यांतुनी ?
का पवित्र पावन होइल भू परतुनी ?
ही कुजकी सडकी घाण लया जाउनी
नव्या मनुंतील नवें शिपाई येति करित गर्जना ? ॥५॥

नांदेल शांतता स्वतंत्रता भूवरी
फडकेल यशाचा समता ध्वज अंबरीं
मग निनाद घुमतिल माणुसकीचे जरी
तोवरी शब्द सृष्टीच्या का अशा वृथा वल्गना ? ॥६॥

---

## २८. येऊं दे रे तुझ्यापाशीं

येऊं दे रे तुझ्यापाशीं
ओठ थरारती जरी
घोटाळतें पुढें मागें
हुरहुर मनीं परी ॥ध्रु०॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
माझ्या हृदयीची ज्योत
तुझ्या वाहीन चरणीं
जरी वाहतसे स्रोत ॥१॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
चढण ही चढतांना
ठेचाळतें रक्ताळतें
तरी तुझा ध्यास मना ॥२॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
सख्या तूंच जीवाधार
तुझ्या निनादतो दारीं
प्रेमिकांचा झणत्कार ॥३॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
माझ्या करींचें नुपूर
मांगल्याची साक्ष देतां
सरे बाजूला काहूर ॥४॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
दया भाकितें मी राया
प्रीति पांघरूण घाली
दाव तुझी खरी माया ॥५॥

येऊं दे रे तुझ्यापाशीं
एकवटुनी साहस
नसे कौतुकाची आस
प्रीती शिकवी धाडस ॥६॥

येतां तुझ्या दारापाशीं
प्राण ज्योती ओवाळीन
तुझ्या चरणाची धूळ
करी पतिता पावन ॥७॥

---

## २९. रे पुन्हां एकदां म्हणशिल ना ?

रे पुन्हां एकदां म्हणशिल ना ?
तूं माझी अन् मी तुझाच ना ? ॥ध्रु०॥
आतुर झालें तव भेटीस्तव
विसरूनि गेलें अपुलें वैभव
दारीं तिष्ठत उभी तुझ्यास्तव
तें प्रणयगीत तूं गाशिल ना ? ॥१॥
खळखळ अवखळ वाहे सरिता
ओसंडूनि ये उन्मादकता
मार्ग प्रतीक्षा करितां करितां
भलते सलते जाचि मना ॥२॥
गत स्मृतीच्या खुळ्या कल्पना
नको उभारूं कुतर्क नाना
कुणी निंदितिल म्हण तूं त्यांना
'सत्प्रीती जाणते दोन मनां' ॥३॥
नकोस मजला अंतर देऊं
सुखमय आशा धुळीस मिळवूं
जीवन संगीत छेडित जाऊं
विसरोनि जगाचा दुष्टपणा ॥४॥

## ३०. ये म्हणशिल तर—

ये म्हणशिल तर येइन सखया तुझ्याहि मी दारीं
तुफान वारा थयथय नाचे वाट हि अंधारीं ।।ध्रु।।

मिचकावुनि वाकुल्या दाविते वीज आकाशांत
धरतीला हि भरे कापरे अवसेची रात ।।१।।

क्षणांत हंसऱ्या मुग्ध बालिका काजळल्या तारा
रूप नागिणी धारण करिती बरसाती धारा ।।२।।

फुत्काराचे, निःश्वासाचे टाकित हुंकार
कड्या कड्याहून गर्जत गाजत निघति मेघस्वार ।।३।।

नीरांजनिं माझिया मिण मिणे प्रीतीची वात
तुझ्या महालीं अनंत नंदादीप तेवतात ।।४।।

मंदिरीं तुझ्या चकचकाकतो शालू जरतारी
दिवाभितें अन् रात किडे मम प्रीतीचे पुजारी ।।५।।

सोन्याची उभविलीस राया तूं अलका नगरी
माझ्या मार्गी दारिद्र्याची पखरण कांटेरी ।।६।।

सत्प्रीतीस्तव हालाहालहि आनंदें पिऊन
राया, तुझिया चरणीं जीवन ज्योती वाहीन ।।७।।

## ३१. मी सासरी निघालें

मी सासरीं निघालें दे आई ग निरोप
डोळे भरून आले घे एकदां समीप ॥ध्रु ॥

तव कानूला मुरडिचा तूं भरविलास घास
येते सणासुदीला घेऊं नकोस ध्यास ॥१॥

तूँ घातलीस वेणी गजरा ग मोगरीचा
कलिकांतुनी सुगंध माझ्या ग माऊलीचा ॥२॥

तूं भरविला चुडा ग भरलीस तूं हि ओटी
विसरुनि जा चुका तूं अपराध घाल पोटीं ॥३॥

बाबा रहा न् आई ये मारुतीचे पार
आलीच कीं नदीं ग ओलांडिलें शिवार ॥४॥

हे गाडीवान दादा गाडीस थांबवा हो
पाहून घेऊं द्या ना आईस एकदां हो ॥५॥

---

बा. क्र. ८३१९५

## ३२. घेतें मी नांव नवं

घेतें मी नांव नवं शब्द नका लावूं
नवतीच्या नवसाला नांव नका ठेवूं ॥ध्रु.॥

प्रीतीची गुंफियली मनामधीं माळ
पूजेला आतुरले करूं नका वेळ
दाटी का मंदिरांत मागं सरा पाहूं ॥१॥

केव्हांचीं ही अशी या दारि मी उभी
ज्योत्स्नेच्या मंचकीं चंद्रमा असे नभी
प्रणय रंगीं रंगला दंग नका होऊं ॥२॥

ओलांडिली पायरी प्रकाशली वात
हृदयीचें छेडिलें गोड कुणी गीत
व्याकुळ मी विरहाचे कष्ट किती साहूं ॥३॥

ओझरती जाहली आतां कुठें भेट
नयनाशीं नयन भिडे ओठाशीं ओठ
व्यर्थ उगी बोलण्यात वेळ नका घेऊं ॥४॥

---

## ३३. म्हणा कुणी ग भोळी भाबडी

म्हणा कुणी ग भोळी भाबडी
माझ्या मायंची माया लई वेडी ॥ध्रु॥

दऱ्या खोऱ्यांतुनी वाळवंटातुनी
वाहे निर्मळ गंगेचं पाणी
तशी तुझी मधुर ग वाणी

स्नेह पदोपदीं जी जोडी ॥१॥

लाखामधें तुझा एक घास
जसा धेनूचा पान्हा पाडसास
नको तोडूंस एवढी आस

धन दौलत तुझ्यापुढं थोडी ॥२॥

तुझ्या कुशींत झोंपला नंद
खेळविला ग तूं गोविंद
तुझा जडला एकचि छंद

अमृताची अविट तुज गोडी ॥३॥

### ३४. तुझ्यासाठीं

तुझ्यासाठीं मी माहेरचं नांव सोडलं
आलें चालून तुझ्या संगं सात पाउलं ॥ध्रु॥

सुख दुःखांत सदाच जिची साउली
जन्म जन्मांति मिळायाची नाहीं माउली
वेडी मायंची माया राया आज सुटली

गणगोत न माझं आतां कांहीं उरलं ॥१॥

'पोर परक्याची धन' जरि बाबा बोललें
ऊणं अधिक न त्यांना ध्यानि मनि शिवलें
केलें श्रम जीवापाड दिनरात राबले

आई बापाचं आज सारं ऋण फिटलं ॥२॥

माझ्या जिवाचा जिवलग तूंच एकला
माझ्या कुंकवाचा धनी राया तूंच एकला
साऱ्या देवा मधि देव राया तूंच एकला

तुझ्यापायीं मी तन-मन-धन वाहिलं ॥३॥

---

## ३८. ही उभी एकली नदी तिरीं

ही उभी एकली नदीं तिरीं
घट तिचा रिकामा झऱ्यावरी ॥धृ॥

रवि किरणांची होई पखरण
गालिं निशेच्या लाली खुलवुन
अरुण अनुभवी प्रणयी जीवन
ती छटा हिच्या का मुखावरी ? ॥१॥

लगबगिनें ती जरी निघाली
मागीं येतां भान हरपली
न कळे कोणी जादू केली ?
का गतस्मृती सळसळे उरीं ? ॥२॥

पक्षांची ये किलबिल कानीं
ऐकुनि त्यांची मंजुळ गाणीं
प्रशांत सुखमय जीवन बघुनी
ही नजर फेकिते कुणावरी ? ॥३॥

चंचलता ये नयनिं दिसुनी
इकडे तिकडे पाही निरखुनी
अशी मोहिनी टाकिली कुणी ?
ना भीती सांज जाहली तरी ॥४॥

तोंच कुठें तरी शीळ नादली
तिच्या प्रीतिला भरती आली
फुलली, खुलली खुदकन हसली
अन् प्रमुदित झाल्या जल लहरी ॥५॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 22440 वि: काव्य
क्रमांक 9320 नों: दि: 30/11/80

## ३६. डायरेक्शन

किती दिसांची घोर तपस्या आज सफळ झाली
टाइम्समध्यें 'नटी पाहिजे' जाहिरात आली ॥ध्रु०॥

"वयाची न मर्यादा कांहीं ना सौंदर्याची
कुमारिकांना चान्स अगोदर कुण्याहि जातीची ॥१॥

मोबदला भरपूर मिळेल सर्व्हिस पेन्शनची
बंगला आधुनिक, मोटरगाडी फोर्ड कंपनीची ॥२॥

बाकी सारे भेटी अंती त्वरित् अर्जासहित
इंटरव्ह्यूला समक्ष यावें सिने स्टूडियोंत" ॥३॥

चिरंजीव, सौभाग्य कांक्षिणी उपवर नटी एक
नापसंत, साभार, कुरूपहि तिज पदव्या कैक ॥४॥

विचार केला तिनें करावा लास्ट हा अटेम्प्ट
रणबालेनें स्वतः उघडिला अभिनव हा स्टंट ॥५॥

"ऐकून आहे नांव आपुलें कीर्तीहि आपुली
कंपनीस वाटते जणूं कीं गृहलक्ष्मी आली ॥६॥

तुमच्या रुपावरी अप्सरा मेनका फिक्याच
तुमच्या लावण्यावर आम्हा गर्व का उगाच ?" ॥७॥

डायरेक्टरच्या अशा स्तुतीनें सर्दचि ती झाली
दोष झाकण्या स्त्री बुद्धि खरी कामाला आली ॥८॥

'क्षमा करा मज मीहि विचारूं का आपुलें नांव ?'
'घरचे धोंडया, पडद्यावरती झेड. डब्ल्यू. राव' ॥९॥

'आजवरी किति सिनेमांतुनी डायरेक्शन केलें ?'
'जे केलें तें सर्व बोलपट सपशेलच पडलें' ॥१०॥

'नांव घ्याल का आपण आपुल्या सौभाग्यवतीचें ?'
'फिफ्टी परसेंट सदा जमतसे उणे भरायाचे' ॥११॥

'किती भांडवल गुंतविलें तुम्ही सिने कंपनीत ?'
'भाग्याची तूं लैला आणिक मी मजनू त्यांत' ॥१२॥

'मुरका घ्या बघूं' 'इश्श मला बाइ नाहीं जुळणार
तुम्ही दाखवा, तुमच्याविण हो मला न जमणार' ॥१३॥

डायरेक्टर तो पट्टीचा पण पीलेला बीर
असली संधी नामी दवडण्या ना वेडा पीर ॥१४॥

'चालायचं बरं कसं लाजुनी सिने स्टूडियोंत ?
गालावरती गुलाब फुलवा जादू नयनांत' ॥१५॥

'पाहिल कुणीतरी' नटी बोलली 'गोंधळ हा अपुला'
'शूटिंग चालू आहे एवढी काळजी कशाला' ॥१६॥

दुसऱ्या दिवशीं मुहूर्त पाहूनि शुभमंगल झालें
डायरेक्टरनें कुमारिकेला डायरेक्शन केले ॥१७॥

---

## ३७. बघ नृपा महालीं धन कुजलें !

बघ नृपा महालीं धन कुजलें
का अजुनि करिशि ना द्वार खुलें ? ॥ध्रु॥

अजिंक्य गिरिचा अतुल हिमाचल
पराक्रमें त्वां केला हतबल
धवल यशाचा ध्वज तव उज्वल
प्रस्फूर्त होऊनि का न डुले ? ॥१॥

रुधिरांचे तूं पाट वाहिलें
असंख्य मानव समरीं पडले
त्या रक्तावर तुवां उभविले
प्रासाद रम्य फुलविलें मळे ॥२॥

लता हासल्या उद्यानांतुन
कला नाचली थय् थय् रंजुन
गेला मानव हर्षें विसरुन
तव मत्त प्रमादहि गुण ठरले ॥३॥

तुझ्या यशाचा शुभदिन ढळला
स्तंभ कीर्तीचा बघ कोसळला
नील नभांतून तारा खळला
तव संस्कृति मंदिर ढासळले ॥४॥

प्रलयाग्निची ठिणगी पडतां
कंपित होइल धरणी माता
मिळेल मातीस अहं मान्यता
मग म्हणशिल माझें धन लुटिलें ॥५॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22440 वि: ७/०४
क्रमांक 9300 नों: दि: 30/9/14

## ३८. झालों मी राजा जर

झालों मी राजा जर, किति किति मजा होणार ॥ध्रु.॥

देइन ताईस मान
होइल दादा प्रधान
मग भरेल असा दरबार ॥१॥

मोठमोठे येतील
नजराणे देतील
कुणि अर्पिल मजला हार ॥२॥

फोटो पुस्तकांत
तसा मसिकांत
देतिल छापून वार्ताहार ॥३॥

करिन बंद शाळा
त्याचा वीट आला
नको खवीस तें मास्तर ॥४॥

रामु, तुला कीं नाहीं
मी रे करिन शिपाई
नका करूं कुणी तक्रार ॥५॥

विमानांत बसून
जाइन वरती उडून
पुन्हां मजेंत खाली येणार ॥६॥

मजा सांगू किती
हर्ष होतों अती
आतां 'राजा' हो मी होणार ॥७॥

## ३९. लोकमान्यांच्या प्रती

लोकमान्यांच्या स्मृतींचें वाजती हे चौघडे
दुंदुभी चोहींकडे ॥ध्रु०॥
नादल्या दाही दिशा अन् व्यापिलें दिव्यांबर
लोपले भस्मासुर ॥१॥
कोटी कोटी बालकांची धन्य झाली माउली
मान्यतेला पावली ॥२॥
स्वाभिमानी भारताच्या अस्मितेचा जो धनी
संगरीं वीराग्रणी ॥३॥
मत्त सत्तांधास सांगे गर्जुनि हा केसरी
"श्रेष्ठ सत्ता ईश्वरी ॥४॥
द्या सुळी फासावरीहि खंत ना त्याची क्षिती
जन्मलों मी भारती ॥५॥
रोमरोमीं बिंबली स्वातंत्र्य भानूची प्रभा
ना कुणाचीहि मुभा" ॥६॥
एकटा हा 'बाळ' छोटा काळ वाटे इंग्रजा
हालवी जो दिग्गजा ॥७॥
झुंजला वैऱ्यासवें जो मित्र होऊनि भला
मान्य लोका जाहला ॥८॥
आज त्यांची आकृति ना हो कृतींची विस्मृति
राहिली आतां स्मृती ॥९॥
भंगलेल्या भावनांनीं पूजितों मी आरती
लोकमान्यांच्या प्रती ॥१०॥

REFBK-0009396
REFBK-0009396